**<u>नियमित दरखास्त क्र. १७/२०१५</u>**
**<u>निशाणी १ वरील आदेश</u>**
**<u>जयभवानी अर्बन को. ऑप. सो. लि. पेठ वडगाव</u>**
**विरुध्द**
**<u>महादेव सिध्दु भोसले वगैरे</u>**

**०१.** सदरची दरखास्त, दरखास्तदार श्री. जयभवानी अर्बन को–ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. पेठ वडगाव यांनी वि.प. क्र. १ महादेव सिध्दु भोसले मयत वारस **१अ)** वत्सला महादेव भोसले, **१ब)** राजाराम महादेव भोसले **१क)** सतीश महादेव भोसले **२)** गणपती लखु शिंदे, **३)** लक्ष्मण बापू माळी मयत वारस **३अ)** रोहीणी लक्ष्मण माळी यांचेविरुध्द् एस.सी.सी. के. नं. १२०४/२००५ मध्ये दिनांक १३/०१/२००९ रोजी पारीत करण्यात आलेल्या हुकूमनाम्यानुसार रक्कम रुपये ४,९४,९७१/– अधिक दरखास्तीचा दरखास्त रक्कम पूर्ण वसुल होईपर्यंत होणारा व हुकूमनाम्याप्रमाणे रक्कम रुपये १,७०,०००/– वर दिनांक ०२/०२/२०१५ पासून पुढील द.सा.द.शे.१६ टक्के प्रमाणे होणारे व्याज अशी मिळूण होणारी रक्कम प्रतिवादी वि.प. यांचेकडून वैयक्तीकरीत्या मिळकतीतून त्यांचे स्थावर व जंगम मिळकतीतून जप्ती विक्री करुन वसूल होवून मिळावी.सदर दरखास्त रक्कम प्रतिवादीचे मिळकतीतून वसूल न झालेस कारणपरत्वे प्रतिवादींना दिवाणी तुरुगात ठेवून दरखास्त रक्कम वसूल होवून मिळावी याकरीता दाखल केली आहे. महादेव सिधु भोसले असे निशाणी १ वर नमुद आहे.तथापी निशाणी ३ ,४, ६ वर महादेव दत्तात्रय भोसले नमुद आहे. कोल्हापूर येथील मे. सहकारी न्यायालय यांचे आदेश सी.सी. एस.नं. १२०४/२००५ नुसार नाव महादेव सिधु भोसले असे आहे.

**०२.** सदर कामी, वि. प. सतीश भोसले यांनी आज रोजी हजर झाले आणि नमुद केले की, वि. प. नं. १ अ या मयत झाले आहेत. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वि.प. नं. १ अ या मयत असल्याबाबतचा अहवाल यापूर्वी दिनांक १२/०४/२०२४ रोजी बेलीफ यांनी सादर केला होता. याबाबत कोणतीही

माहिती न घेता या न्यायालयातील लिपीक यांनी वत्सला महादेव भोसले यांना नोटीस पाठवली आहे.

**०३**. सदर कामी निशाणी २६ वर दरखास्तदार यांनी कागदपत्र दाखल केले आहेत आणि निशाणी २८ वर , इश्यु नोटीस चा आदेश दिनांक ११/०१/२०२४ रोजी पारीत केला आहे. दिनांक २२/०४/२०२४ रोजी लिपीक यांनी विक्रीच्या उदघोषणेच्या अटी ठरविण्यासाठी तारीख निश्चीत करण्यात आली आहे अशा , सदर आशयाची नोटीस दिनांक ०४/०४/२०२४ रोजी पाठवली आहे. याबाबत बेलीफ रीपोर्ट नुसार वत्सला भोसले मयत असल्याचा रिपोर्ट सादर केला. दिनांक २२/०४/२०२४ रोजी, दिनांक ०३/०५/२०२४, १०/०५/२०२४ वि. प. यांनी मुदत मागणी केली आहे. दिनांक २४/०२/२०२५ रोजी perused recod, JD absent, No application on record. No say filed by JD. Notice is duly served. No say granted against JD असा आदेश केला आहे. सदर अर्जामध्ये दरखास्तदार यांनी वि. प. यांचे विरोधात मिळकतीचा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१ नियत ६६ नुसार स्थावर मिळकतीचा विक्री करणेची उदघोषण होणेविषयी विनंती आहे तसेच वि.प. यांना नोटीस काढण्यात यावी अशी विंनती केली होती. निशाणी २८ वर या न्यायालयाने, दिनांक ०३/०२/२०२५ रोजी राजाराम पाटील यांनी निशाणी ३५ वर ॲफिडेव्हीट केले आहे. त्यामध्ये नमुद केले आहे की, इतर न्यायालयात अपील किंवा स्थगीती नाही. सबब दरखास्त रक्कम वसुली बाबत आदेश व्हावा. त्यामुळे दिनांक २४/०२/०२५, या न्यायालयाने वि.प. यांनी, सदर अर्जास म्हणणे दाखल करण्यासाठी नोटीस पाठविण्याचा आदेश पारीत केला आहे. दिनांक ०७/०५/२०२४ रोजी आणि दिनांक १०/०५/२०२४ रोजी सदर कामी निशाणी ३२ व ३३ वर म्हणणे देणेस मुदत मिळावी आणि जाहीरनामा व वॉरंट आदेशावर आहे असा अर्ज दाखल करुन मुदत घेतली आहे.

**०४.** निशाणी २८ वरील अर्ज दिनांक ११/०१/२०२४ रोजी दाखल केला आहे. तथापी निशाणी ३६ वरील नोटीस, मध्ये सदर निशाणी २८ वरील अर्ज दिनांक २२/०२२०२५ रोजी दाखल केला आहे त्यावरील मे. न्यायालयाने सोबत जोडलेल्या नकलेप्रमाणे आदेश पारीत केला आहे. म्हणून विक्रीच्या उदघोषणा अटी ठरवण्यासाठी दिनांक १४/०७/२०२५ हा दिवस निश्चीत केला आहे. दिनांक १८/०६ *२०२५ ची नोटीस दिसत आहे. सदर नोटीस सोबत मे. न्यायालयाची निशाणी २८ वरील प्रत जोडली आहे. आणि स्टेनो यांनी दिनांक २४*/०२/२०२५ रोजीची आदेश २१ निशाणी ६६ ची टायपींगची कच्ची प्रत जोडली आहे. सदर आदेशावर न्यायालयाची सही दिसून येत नाही. सदर विना सहीच्या ३ प्रति दिसत आहेत. एका आदेशावर स्टेनोने पेनने नो से ऑर्डर करणे असे लिहीले आहे. या कामी निशाणी २८ वर म्हणणे दाखल करणेसाठी नोटीसचा आदेश मे. न्यायालयाने पारीत केला होता. पण सदर लिपीक यांनी पुर्ण कागदपत्र अवलोकन न करता, आदेश २१ नियम ६६ ची मे. न्यायालयाचे विना सहीची नोटीस वि. प यांना पाठवली आहे असे अभिलेखावरुन दिसून येत आहे. त्यामुळे निशाणी ३७ वर वि. प. यांनी दिनांक १४/०७/२०२५ रोजी मिळकतीचा विक्रीसंदर्भातील जाहीरनामा प्रसिध्द करण्यावर आहे. पण यातील वि. प तडजोड करण्यास तयार आहेत. विक्री जाहीरनामा स्थगीत करावा असा अर्ज दाखल केला. तथापी दिनांक १४/०७/२०२५ रोजी दरखास्तदार यांनी निशाणी ३८ वर आदेश २१ नियम ६६ प्रमाणे अर्ज दाखल केला आणि विनंती केली की, वि.प. नं. १ ब क यांची जप्त मिळकत लिलावासाठी विक्री घोषणापत्र तयार करुन लिलाव प्रक्रिया राबवण्यास मान्यता दयावी. लिलावाच्या अटी व नियम ठरवून योगय तारीख निश्चीत करावी लिलावाच्या माध्यमातून दरखास्त रक्कम पुर्ण वसुली करण्यास परवानगी मिळावी.

**०५.** संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, लिपीक यांनी स्टेनो यांनी तयार केलेली , मे. न्यायालयाचे विना सहीचे, टायपींग केलेली प्रत

नोटीस सोबत पाठवली आहे. सदरची नोटीस वि. प. सतीश भोसले यांनी स्वीकारल्याचे नमुद आहे. त्यांची सही आहे. दरखास्तरदार आणि वि. प. यांचे अभिलेखावरील कागदपत्र यांचा विचार करता, लिपीक आणि स्टेनो यांनी केलेल्या चुकीमुळे दरखास्तदार आणि वि.प. यांचे न्यायहक्काचे नुकसान होवू नये याकरीता, सदरची मे. न्यायालयाची नोटीस कायदेशीर रीत्या ग्राहय होत नाही. सबब, सदर कामी निशाणी २८ वरील मे. न्यायालयाचे सही असणारे आदेशाप्रमाणे आणि निशाणी ३८ वरील अर्जानुसार वि. प. यांनी त्यांचे म्हणणे सादर करणेबाबत न्यायातत्वानुसार आदेश पारीत करण्यात येत आहेत.

**आदेश**

१. वि. प. यांनी निशाणी २८ आणि निशाणी ३८ वर म्हणणे सादर करावे.

२. वि.प. यांना मे. न्यायालयाच्या सही शिवाय दिलेली नोटीस कायदेशीररित्या ग्राह्य नाही.

SMITA JAGANNATH PENDE
Digitally signed by SMITA JAGANNATH PENDE
Date: 2026.05.22 20:21:09 +0530

दिनांक २२/०५/२०२६ **(एस.ज.पेड)**

पेठ वडगाव

दुसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
पेठवडगांव